जिल्हा परिषद, गोंदिया
सामान्य प्रशासन विभाग
जि.प.प्रशासकीय इमारत,आमगांव रोड,गोंदिया-441601



website:-www.zpgondia.gov.in Ph.No.:- 07182 236425
dyceovp_zpgondia@rediffmail.com /dyceovpgondia01@gmail.com

जा.क्र. /जिपगों/साप्रवि/कार्या-१०/व.स./७०९/२०२६ **दिनांक**:- 28.102026

वाचा :- १.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय अकंपा- १२२५/प्र.क्र. १२१/म.लो.आ. दिनांक १७.०७.२०२५.
२.ग्राम विकास विभाग,महा.शासन,शासन निर्णय क्रमांक अकंपा २०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि. ३१.०७.२०२५.
३. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. /जिपगों/साप्रवि/कार्या-१०/व.स./६०३/२०२६ दिनांक २१.०९.२०२६.

परिपत्रक :-

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुबांतील वारस यांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यासंबंधाने दिनांक ३१.०८.२०२६ अखेरपर्यंत प्राप्त अनुकंपाधारकांची एकूण १५६ प्रकरणांची तात्पुरती प्रतीक्षासूची व संभाव्य नियुक्ती संबंधाने माहिती पूर्ण असलेले गट-क - ७० व गट-ड - ०२ असे एकूण ७२ प्रकरणे असे तीन स्वतंत्र तात्पुरती प्रतीक्षासूची जिल्हा परिषद, गोंदियाचे सूचना फलक / जिल्हा परिषद गोंदियाचे संकेतस्थळावर (www.zpgondia.gov.in) तात्पूरती प्रतीक्षासूची संदर्भ क्र. ०३ च्या परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात येवून दिनांक ०५.१०.२०२६ रोजी सायं ५.०० पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते.

तसेच ज्या गट क मधील अनूकंपाधारक उमेदवारांना गट-ड मध्ये विकल्प द्यायचा असेल त्यांनी दिनांक ०५.१०.२०२६ सायंकाळी ५.०० पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने एकूण १५ आक्षेप या कार्यालयास प्राप्त असून संपुर्ण आक्षेप मान्य करण्यात आल्यानंतर दिनांक ३१.०८.२०२६ अखेरपर्यंत प्राप्त प्रस्तावानुसार माहिती पूर्ण असलेले गट-क - ७३ व गट-ड - ०६ असे एकूण - ७९ प्रकरणे आहेत. त्यानुषंगाने गट-क व गट-ड अशा दोन स्वतंत्र अंतिम प्रतीक्षासूची जिल्हा परिषद, गोंदियाचे सूचना फलक/संकेतस्थळावर (www.zpgondia.gov.in) प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(टिप :-जिल्हा परिषद,गोंदिया अंतर्गत प्रतीक्षासूचीतील सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, प्रतीक्षासूचीतील अनुकंपाधारकांची नेमणूक शैक्षणिक अर्हता व सामाजिक प्रवर्गानुसार समुपदेशन प्रक्रियेद्वारे व पारदर्शकता ठेवून राबविण्यात येणार असल्याने उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला / भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. याबाबत कोणीही रकमेची मागणी केल्यास किंवा नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवित असल्यास अनुकंपाधारक उमेदवारांनी खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधावा.)

१) श्री. जेनित चंद्रा दोन्तूला (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.
मो. ७०५७०३३००४

२) श्री. फरेंद्र आर. कुतिरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, गोंदिया.
मो.९४०४४८१७२१६

(जेनित चंद्रा दोन्तूला.,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

प्रतिलिपी :-१.मा. अध्यक्ष/ मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.खाते प्रमुख, जिल्हा परिषद, गोंदिया (सर्व)
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व) यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस अग्रेषित. पूर्ण/अपूर्ण असलेल्या प्रकरणांची तात्पुरती प्रतिक्षा सुची जिल्हा परिषद गोंदियाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली असुन सदर तात्पुरती प्रतिक्षासूची आपले सुचना फलकावर प्रसिद्ध करावी.

(जेनित चंद्रा दोन्तूला.,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

जिल्हा परिषद, गोंदिया

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत अनुकंपा तत्त्वावरील प्रलंबित संभाव्य नियुक्ती देण्याकरिता दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्राप्त प्रस्तावानुसार माहिती पूर्ण असलेल्या प्रकरणाची अंतिम प्रतीक्षा सूची.

अ.क्र.	विवरण	एकूण उमेदवारांची संख्या
१	अनुकंपा तत्वावर गट-क व गट-ड चे पदावर संभाव्य नियुक्ती करीता उमेदवारांची संख्या	गट क- ७३ गट ड- ०६
२	एकूण पात्र उमेदवारांची संख्या	७९